I10yn

पोलीस ठाणे सोयगांव ता. सोयगांव

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** सोयगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0149 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/08/2025 01:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 28/08/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/08/2025
**Time From (वेळेपासून):** 13:17 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/08/2025 **Time (वेळ):** 01:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/08/2025 01:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 9 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जरंडी,सोयगाव,सोयगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समाधान भगवान पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जरंडी ,सोयगाव ,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जरंडी ,सोयगाव ,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9765943172

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरविंद बिरबल राठोड | | | 1. जरंडी ता सोयगाव ,सोयगाव , छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजु मोसम बरडे | | | 1. पोहेका/163,नेमणुक पोस्टे सोयगाव ,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 3 | रविंद्र रामदास तायडे | | | 1. पोका/1542 ,नेमणुक पोस्टे सोयगाव,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | सुनिल मुर्लीधर सोनोने | | | 1. जुना बाजार चौक सोयगाव, सोयगाव ,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 06 नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 28/08/2025

मी समाधान भगवान पाटील, वय 47 वर्षे, धंदा शेती, मौजे जरंडी ता.सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर, मो नं 9765943172
समक्ष मौजे जरंडी ता सोयगाव जि छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन फिर्याद देत आहे की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर माझी पत्नी मिनाक्षी,मुलगा अभिजीत आणि मुलगी सानिका यांचेसह राहणेस आहे मी शेती करुन कुटूंबाची उपजिवीका भागवतो.
माझा परिचयाची महीला नामे सारीका आगे हिचेसोबत माझा पैशाचा आर्थीक व्यवहार झाला होता. सदर आर्थीक व्यवहारात आमचे वादविवाद झाल्याने सारीका आगे हिने दिनांक 02/07/2025 रोजी पोलीस स्टेशन सोयगाव छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी फसवणुकीचा तक्रार अर्ज माझे विरोधात दिला होता सदर अर्जाच्या चौकशी कामी सोयगाव पोलीस स्टेशनचे जमादार बर्डे यांनी माझ्या गावातील इसम अरविंद राठोड यास संपर्क करुन दिनांक 02/07/2025 रोजी माझे राहते घरी पाठविले होते. सदर दिवशी मी दर्शनाकामी पंढरपुर येथे असल्याने माझ्या पत्नीने मला संपर्क साधुन माहीती दिली की, अरविंद राठोड याने सोयगाव पोलीस स्टेशनला मला नेवुन जमादार बरडे यांची भेट घालुन अर्जदार सारीका आगे हिच्यासोबत समझौता घडवुन आणला आहे. सारीका आगे हिने सादर केलेला माझ्या विरोधातील लेखी तक्रार अर्ज निकाली काढला आहे. सदर अर्ज निकाली काढले बाबत लेखी पत्रावर माझी पत्नी मिनाक्षी हिची सही घेतली होती.
दिनांक 05/07/2025 रोजी अरविंद राठोड यांने मला संपर्क साधुन आणि राहते घरी येवून कळविले की, जमादार बरडे आणि पोलीस शिपाई तायडे यांनी तुझ्या विरोधातील अर्ज निकाली काढुन तुझ्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता तुला सोडुन दिले आहे त्याचा मोबादला म्हणुन त्यांना 15,000/- हजार रुपये दयावे लागतील. त्यावेळी मी त्याकडुन नंतर पाहु असे सांगुन वेळ मागुन घेतला होता. दिनांक 15/08/2025 रोजी दुपारी 02.00 वाजेच्या सुमारास मी आणि माझ्या ओळखीचा राजेंद्र गेहलोत असे रजिष्ट्री कार्यालय सोयगाव या ठिकाणी असतांना पोलीस शिपाई तायडे मला येवून भेटला त्यावेळी त्याने माझ्या कडे 15,000/- हजार रुपयांची लाच मागणी करुन देण्यास आग्रह धरला त्यावेळी मी राजेंद्र गेहलोत याचे मोबाईलवरुन पोलीस शिपाई तायडे याचे सांगणेवरुन त्रयस्थ इसमास 5000/- रुपये पाठवुन दिले सदर वेळी पोलीस शिपाई तायडे याने उर्वरित दहा हजार रुपये लवकारात लवकर देण्यास सांगुन नाहीतर कारवाई होईल असे धमकावले होते.
मी आज दिनांक 28/08/2025 रोजी अरविंद राठोड, जमादार बरडे, पोलीस शिपाई तायडे यांची भेट घेवून त्यांनी

मागणी केलेल्या उर्वरित 10,000/- रुपयांबाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चेत त्यांनी माझ्याकडे पैशाची मागणी
केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 28/08/2025
रोजी लाप्रवि कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे लाचमागणी बाबत संपर्क साधुन कळविले होते. त्यावरुन माझ्याकडे
पोनि शिंदे सापळा पथकासह हजर झाले त्यांनी विचारले वरुन मी वरील प्रमाणे तक्रार लिहुन दिली आहे. माझा
आणि त्यांच्या दरम्यान कोणताही उधारी उसनवारीचा व्यवहार नसुन तसेच आमच्यात कोणतेही वैमनस्य नाही.
वरील प्रमाणे तक्रार दिल्यावरुन दिनांक 28/08/2025 रोजी पोनि शिंदे यांनी सापळा पथक, पंच,आणि मला
लाचमागणी पडताळणी बाबत सुचना दिल्या. सदर कारवाईमध्ये वापरण्यात येणारे व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी
कार्ड टाकुन ते चालु करुन माझ्या गळ्यात अडकवुन पंच क्र.1 यास माझे सोबत देवून मी माझी मोटार सायकल टी
व्ही एस व्हीक्टर क्रमांक एम एच 20 यु व्ही 9042 यावरुन सुरक्षित ठिकाणावरुन 13.17 वाजता लाचमागणी
पडताळणी करीता रवाना झालो मी पंच क्र.1 सह जावून रुद्रा ढाबा जरंडी,सोयगाव पोलीस स्टेशन आणि न्यु मुरली
हॉटेल सोयगाव या ठिकाणी जावून अरविंद राठोड,जमादार बरडे,पोलीस शिपाई तायडे, यांची भेट घेवून 14.47
वाजता सुरक्षित ठिकाणी परत आलो. सदर ठिकाणी माझ्या गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर सापळा पथकातील पोलीस
हवालदार जोशी यांनी काढुन बंद करुन पोनि शिंदे यांचे ताब्यात दिले. सदर वेळी पोनि शिंदे यांनी विचारले वरुन
घडलेल्या घटनेबाबत मी आणि पंच क्रमांक 1 यांनी माहीती दिली. मी पंचासमक्ष अरविंद राठोड याची भेट घेतली
असता त्याने मला सांगीतले की, काल मी काय म्हणालो होतो तुह्याकडुन होत नसेल तसं स्पष्ट सांगुन जायचं
महयाशी होत नाही तेव्हा केलं असतं जेव्हा तु गरम गरम मधे देवून टाकलं असतं साहेब घेवून टाका आणि विषय
मिटवून टाका, लगेच त्यांना तु बिनधास्त जाय मी आहे ना, किती तासात देतो तु त्याले, तो येतोय सोयगावले 1
दिड तासात मुरली हाटेलवर. तसेच पोलीस तायडे यांची सोयगाव पोलीस स्टेशन येथे भेट घेतली असता त्यांनी
सांगीतले की, नाही नाही मी सांगतो त्यांना बरं ठिक आहे. तिथे गेले की मला एक कॉल करा. त्यानंतर मी न्यु मुरली
हॉटेल सोयग़ाव या ठिकाणी असतांना बरडे यांचेसोबत झालेल्या भेटीत त्यांनी सांग़ितले की, हा हां, अर्जदार कोण
आहे? अर्ज कोणाकडे आहे ? तुम्ही माय नाव सांगायचं बरं या तिथं बोलु पोलीस स्टेशनला हां या तसेच सदर
ठिकाणी पोलीस शिपाई तायडे यांची देखील भेट झाली सदर भेटीत तायडे यांनी मला सांगीतलं की, सांगितले की,
तायडे साहेबांकडे दया, माहिती आहे साहेबाला आहे सगळं.. ते बोलता येत नाही.. करुन देतो. कॅश आहे का ? ते
त्याच्या जवळ देऊन टाक त्या पोऱ्याकडे देवुन टाकाना त्याच्याकडे, तीन आहे नं. तुमच्याकडे सदर वेळी पोनि शिंदे
यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील कैद झालेले संभाषण ऐकले असता त्यांची खात्री झाली की, माझ्या विरोधातील निकाली
काढलेल्या तक्रार अर्जात माझ्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही म्हणुन जमादार बरडे यांनी लाचेस
प्रोत्साहन दिले. तसेच पोलीस शिपाई तायडे यांनी स्वत:करीता तडजोडीअंती 3,000/- रुपये लाच मागणी करुन
काही वेळाने न्यु मुरली, हॉटेल, रजिस्ट्री ऑफिसचे बाजुस सोयगाव या ठिकाणी स्विकारण्याचे कबुल केले. तसेच
यापुर्वी पोलीस शिपाई तायडे यांनी केलेल्या 15,000/- रुपयाच्या लाच रकमेपैकी 5,000/- रु. त्यांचे
सांगण्यावरुन त्रयस्थ व्यक्तीस दि. 25/08/2025 रोजी मोबाईलवरुन ऑन लाईन पाठवुन दिले आहे.

माझ्याकडे पोलीस शिपाई तायडे यांनी मागणी केलेली लाच रक्कम 3,000/- रुपये लागलीच स्विकारण्याची
तयारी दर्शविल्याने पोनि शिंदे यांनी लाच स्विकृती सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविले. सदर सापळा
कारवाईकरीता आवश्यक लाच रक्कम मी बचतीचे 3,000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 6 चलनी नोटी
पंचासमक्ष ताब्यात दिल्या. सदरची रक्कम पोलीस शिपाई तायडे यांना देण्यासाठी लाच रक्कम म्हणुन वापरावयाची
असल्याने त्यावर पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावुन पंच क्र. 02 यांन पोनि शिंदे यांचे आदेशावरुन त्या नोटांचे
क्रमांक कागदावर नोंद केले. तसेच पोलीस शिपाई तायडे किंवा त्यांचेकरीता दुसऱ्या व्यक्तीने लाचेची रक्कम
स्विकारल्यास मी डोळ्यावरील चष्मा काढुन डोक्यावरती लावण्याचा नियोजित इशारा ठरला. लाचमागणी कारवाई
प्रमाणेच व्हाईस रेकॉर्डरचा वापर करावयाचा असल्याने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन ते माझ्या शर्टाचे
आमध्ये गळ्यात अडकवुन पोलीस शिपाई तायडे याने सांगितल्याप्रमाणे न्यु मुरली हॉटेल, सोयगाव या ठिकाणी पंच
क्र. 01 यांच्यासह माझी स्वत:ची टि.व्ही.एस. व्हिक्टर क्र. एम.एच.20 यु.व्ही. 9042 या मोटार सायकलने
सुरक्षीत ठिकाणापासुन 15.16 वाजता रवाना झालो. आमचे पाठोपाठ पोनि शिंदे आणि सापळा पथक असे सरकारी
वाहनाने न्यु मुरली हॉटेल, रजिस्ट्री ऑफिसचे जवळ येऊन, आडोशाला थांबुन राहिले. मी पंच क्र. 01 यांचेसह न्यु
मुरली हॉटेलमध्ये जावुन पोलीस शिपाई तायडे यांची भेट घेवुन सुमारे 15.40 वा. लाचस्विकृतीचा नियोजीत इशारा
केला. मी नियोजित इशारा करताच पोनि शिंदे व सापळा पथक हॉटेलमध्ये आले. त्यावेळी पोनि शिंदे यांनी
माझ्यासह पंच क्र. 01 यांना सापळा कारवाईमध्ये लाच रक्कम कोणी स्विकारली असुन लाच रक्कम कोठे आहे असे
विचारले असता त्यावेळी मी व पंच क्र 01 यांनी सांगितले की, सापळा कारवाई दरम्यान आम्ही हॉटेलमध्ये आलो
असता पोलीस शिपाई तायडे यांनी सदरची रक्कम हॉटेलच्या कॉन्टरवर बसलेल्या इसमास देण्यास सांगितली. सदर

कॉन्टरवर बसलेल्या इसमाने ती रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्याचे पँटचे उजव्या खिशात ठेवली आहे. त्यानंतर मी सदर हॉटेलच्या कॉन्टरवर बसलेल्या इसमाकडे अंगुली निर्देश करुन लाच रक्कम पोलीस शिपाई तायडे यांचे सांगण्यावरुन स्विकारली असल्याचे सांगितले. सदरवेळी पोनि शिंदे यांनी स्वत:सह सापळा पथकाची ओळख पटवुन ताब्यातील हॉटलेच्या कॉन्टरवर बसलेल्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव सुनिल मुरलीधर सोनोने वय-53 वर्षे धंदा हॉटेल मालक, रा. जुना बाजार चौक, सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगुन लाच रक्कम त्याचे पँटच्या उजव्या खिशात असल्याचे त्याने सापळा पथकास सांगितले. सदर वेळी पोनि शिंदे यांच्या सांगण्यावरुन पंच क्र. 02 यांनी इसम नामे सुनिल सोनोनें यांचे पँटच्या उजव्या खिशातील लाच रक्कम बाहेर काढुन त्या नोटांची त्यांचेकडील अगोदरच नोंद असलेल्या कागदावरुन खात्री केली असता त्याच भारतीय चलनाच्या 500/- रु. दराच्या सहा नोटा असे एकुन 3000/- रु. रक्कम असल्याचे व त्याच लाच स्विकृती सापळा दरम्यान वापरलेल्या असल्याचे दिसुन आले. त्यानंतर इसम नामे सुनिल सोनोने याचे हातावर पंचासमक्ष अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन तपासणी केली असता. त्याच्या दोन्ही हाताच्या तळव्यावर, बोटांवर तसेच अंगावर, पँटच्या उजव्या खिशाला ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली तसेच सदर ठिकाणी हजर असलेले दुसरे इसम यांना पोनि शिंदे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रविंद्र रामदास तायडे वय 38 वर्षे धंदा नोकरी पोलीस शिपाई बक्कल नंबर 1542, नेमणुक पोलीस ठाणे सोयगाव असे सांगीतले असता त्यांना पुढील कारवाई कामी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पोनि शिंदे यांनी व्हाईस रेकॉर्डरमधील कैद झालेले संभाषण ऐकले असता दिलं नां..काय यार माणसं हे तुम्ही.. इकडं नका ठेवू तिकडंच ठेवा.. तुमच्या कडंच राहुदया (हॉटेलवाल्याला उददेशुन) नाही बरडे साहेब येतील त्यांचे कडंच दया मग.. ते तिथं ठेवा ना तुम्ही असे पोलीस तायडे संभाषण करीत असल्याचे खात्री झाली की, पोलीस शिपाई तायडे याने माझ्याकडुन लाचेची 3 हजार रुपये रक्कम हॉटेल मालक सुनिल सोनोने यांचेकरवी स्विकारलेली आहे.

त्यानंतर पोनि शिंदे घटनास्थळावर प्राथमिक कारवाई करुन पुढील कारवाई सोयगाव पोलीस स्टेशन येथे करणार असल्याचे सांगीतले मी सापळा पथक दोन्ही पंच आणि ताब्यातील दोन्ही इसम असे पोलीस ठाण्यास आलो त्याबाबत दिनांक 28/08/2025 रोजी लाचमागणी पडताळणी पंचनामा आणि यशस्वी सापळा पंचनामा पुर्ण करण्यात आला आहे. पोनि शिंदे यांचे आदेशावरुन.मी घडलेल्या घटनेची वरील प्रमाणे फिर्याद दिली असुन ती पोनि शिंदे यांनी टंकलिखीत केलेली आहे.

तरी दिनांक 28/08/2025 रोज़ी 13.17 वा ते 15.40 वा दरम्यान रुद्रा ढाबा जरंडी, पोलीस स्टेशन सोयगाव आणि न्यु मुरली हॉटेल सोयगाव या ठिकाणी अरविंद बिरबल राठोड, पोलीस शिपाई तायडे यांनी माझे विरोधातील निकाली काढलेल्या अर्जात माझ्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही म्हणुन बक्षिस मोबदला स्वरुपात 15,000/- रुपयांची लाचमागणी करुन तडजोडी अंती 3000/- हजार रुपये पोलीस शिपाई तायडे यांनी ती लाचरक्कम न्यु मुरली हॉटेलचे मालक सुनिल सोनोने यांचेकरवी स्विकारली. तसेच जमादार बरडे; यांनी लाचमागणीस प्रोत्साहन दिले आहे सबब माझी अरविंद राठोड,जमादार बरडे, पोलीस शिपाई तायडे, आणि सुनिल सोनोने यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

PANKAJ DEVISING BARWAL(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले), or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नंकार दिला):**

or (ज़्या कारणांमुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नांव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

सहा.पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन रमेगांव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PANKAJ DEVISING B/
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API